# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १०.०७.२०२६

**जिल्हा : कोल्हापूर**

| मागील आठवड्यातील हवामान (०४.०७.२०२६ ते १०.०७.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (११.०७.२०२६ ते १५.०७.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | दिनांक | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| ५६.८ | ५१.२ | २७.४ | ४१.२ | २५.६ | २२.० | ०.६ | पाऊस (मिमी) | ४ | ३ | ३ | ६ | ९ |
| २७.० | २४.२ | २४.८ | २६.४ | २६.५ | २७.० | २८.२ | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३१ | ३१ | ३० |
| २२.४ | २२.२ | २१.८ | २३.२ | २३.४ | २१.८ | २३.५ | किमान तापमान (अं.से.) | २३ | २३ | २३ | २३ | २४ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | स. ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ७ | ६ | ८ |
| ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | ८ | दु. | | | | | |
| ९५ | ९४ | ९३ | ९६ | ९५ | ९२ | ८७ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८७ | ८५ | ८५ | ८६ | ८५ |
| ९२ | ९ | ९५ | ९५ | ९२ | ८९ | ७९ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८३ | ८२ | ८१ | ७७ | ७८ |
| ७.४ | ८.४ | ११.२ | १२.० | १०.२ | ६.७ | ६.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १५ | १९ | २१ | २० | १९ |
| नै. | नै. | वा. | प.नै. | प. | प. नै. | नै. | स. वाऱ्याची दिशा | प.नै. | प. | प.नै. | प.नै. | प.नै. |
| प.वा. | प.नै. | प.नै. | द.नै. | वा. | नै. | प.वा. | दु. | | | | | |

| मागील आठवड्यातील पाऊस (मिमी) | पाऊस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत (मिमी) | पाऊस दिवस ०१.०१.२०२६ पासून आजपर्यंत |
|---|---|---|
| २२४.८ | ४३५.८ | २१ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ११, १२ ,१३, १४ व १५ जुलै रोजी आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील घाट भागात ११, १२ ,१३, १४ व १५ जुलै रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या तसेच मध्य व पूर्व भागात ११, १२ ,१३, १४ व १५ जुलै रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. कोल्हापूर जिल्ह्यामध्ये १५ जुलै पर्यंत कमाल तापमान ३०.० ते ३१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २३.० ते २४.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८५ ते ८७%, दुपारची सापेक्ष आद्रता ७७ ते ८७% तसेच वाऱ्याचा वेग ताशी १५ ते २१ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १० ते १६ जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. दिनांक १७ ते २३ जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ❖ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबाईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून " मेघदूत" अँड्रॉइड अॅप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा. |
| संदेश | | वाफसा आल्यावर पेरणी करावी. पेरणी शक्यतो बिबीएफ पद्धतीने किंवा सरी ओरंब्यावर करावी |
| भात | पुनर्लागवड | ➢ ज्या भागामध्ये पुरेसा पाऊस झालेला आहे त्या भागात भात पुनर्लागवड सुरु करता येऊ शकते.<br>➢ हळव्या जातींची पुनर्लागवड पेरणीनंतर २१ ते २५ दिवसांनी, निमगरव्या जातींची २३ ते २६ व गरव्या जातींची २५ ते ३० दिवसांनी करावी.<br>➢ रोपांची पुनर्लागवड हळव्या वाणांमध्ये १५ x१५ सें.मी आणि निमगरव्या ,गरव्या आणि संकरीत वाणांमध्ये २० x१५ सें.मी या अंतरावर करावी. |
| नाचणी | पेरणी | ➢ नाचणी पीक २ ते ३ पानांच्या अवस्थेत आहे. पिकाच्या गरजेनुसार संरक्षक सिंचन द्यावे.<br>➢ १५ जुलैनंतर नाचणीची पेरणी टाळावी. |
| खरीप ज्वारी | पेरणी | ➢ वाफसा असल्यास पेरणी पूर्ण करावी. लवकर पेरणी केल्यास खोडमशीचा उपद्रव कमी होतो. बीजप्रक्रिया : खरीप ज्वारीस १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझोटोबॅक्टर किंवा २५० ग्रॅम अॅझोस्पिरीलम हे जिवाणू खत चोळावे. त्यामुळे १५ ते २० टक्के उत्पादन वाढते.<br>➢ खत मात्रा : हेक्टरी ४० किलो नत्र, २० किलो स्फुरद आणि २० किलो पालाश द्यावे. यापैकी नत्राची अर्धी मात्रा तसेच स्फुरद व पालाशाची संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळी द्यावी. |
| मका | पेरणी | ➢ शेतकरी बंधु ज्या ठिकाणी वाफसा आला आहे त्या ठिकाणी १५ जुलै पर्यंत पेरणी करू शकतात. पेरणी बिबीएफ पद्धतीने किंवा सरी ओरंब्यावर करावी |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | ➢ ज्या ठिकाणी लवकर पेरणी झालेले आहे आणि पाने पिवळी पडत आहे अश्या ठिकाणी १% युरियाची फवारणी करावी<br>➢ किडीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्या जवळ दिसून येत असल्यास ५ टक्के निबोळी अर्क किंवा अॅझाडिरेक्टिन१५०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>➢ पेरणीनंतर २० ते २५ दिवसांनी फुले सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड-II ची फवारणी करावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ सुरू ऊसामध्ये ज्या ठिकणी पोक्का बोइंगचा प्रादुर्भाव आलेला आहे आणि जमिनीमध्ये ओलावा आहे अश्या ठिकाणी एकरी २ किलो ट्रायकोडर्मा ४० किलो गांडूळखतामध्ये किंवा २० किलो शेणखतामध्ये मिसळून दिल्यास चांगले नियंत्रण होते. |
| सोयाबीन | पेरणी | ➢ ज्या बियाण्याची अंकुरण उगवण क्षमता ७० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त आहे असे ५५ ते ७५ किलो बियाणे प्रती हेक्टर साठी वापरावे.<br>➢ ज्या ठिकाणी वाफसा आला आहे त्या ठिकाणी पेरणी करावी. पेरणी बिबीएफ पद्धतीने किंवा सरी ओरंब्यावर करावी<br>➢ बीजप्रक्रिया : जमिनीतून प्रसार होणाऱ्या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाणास कार्बोक्झीन ३७.५% + थायरम ३७.५% डी.एस. ३० ग्रॅम प्रति १० किलो बियाणास चोळावे त्यानंतर थायोमिथोक्झाम ३०% एफ.एस. १०० मिली प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी किंवा अझोक्सिस्ट्रोबीन २.५% + थायोफिनेट मिथाईल ११.२५% + थायोमिथोक्झाम २५% एफ.एस. १०० मिली या संयुक्त बुरशीनाशक व कीटकनाशकाची बिजप्रक्रिया करावी. त्यामुळे रोपमर, कॉलर रॉट, खोड माशी व रस शोषक किडी पासून रोपावस्थेत पिकाचे संरक्षण होईल. |
| भुईमूग | पेरणी | ➢ शेतात वाफसा स्थिती निर्माण झाल्यास दिनांक १५ जुलैपर्यंत पेरणीची कामे पूर्ण करावीत.<br>➢ **वाणांची निवड :** फुले उन्नती, फुले धनी, फुले मोरणा ,फुले वारणा<br>➢ **बीजप्रक्रीया -** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (घनरूप किंवा द्रवरूप) चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे<br>➢ **आंतरपिके :**खरीप भुईमुग पिकात सोयाबीन, सुर्यफुल, मुग, उडीद व तूर हि आंतरपिके ६ :२ या प्रमाणात घेतल्यास अधिक आर्थिक फायदा होतो. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी : भुईमुग+सोयाबीन (४:१) आणि कडेने एरंडीची लागवड (दोन ओळी) |
| मिरची | वाढीची | ➢ मागील आठवड्यामध्ये पाऊस, वाढलेली आद्रता यांमुळे मिरची पिकावर चुरडा मुरडा या विषाणूजन्य रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. या रोगाचा प्रसार फुलकिडे, मावा आणि कोळी या रस शोषून घेणाऱ्या किडीमार्फत होतो. ह्या किडी पानातील अन्नरस शोषून घेतात. त्यामुळे पानाच्या शिरामधील भागावर सुरकुत्या पडून संपूर्ण पानांची वाढ खुंटते आणि झाड रोगट दिसते.<br>➢ मावा किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रीड १७.८% एस. एल. प्रति २.५ मिली / १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. फुलकिड्यांच्या नियंत्रणासाठी फिप्रोनील ५ एस.सी. २० मिली. आणि कोळीच्या नियंत्रणासाठी फेनॅक्झाक्विन १० ईसी. २५ मिली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| पशुधन | वाढीची | ➢ जनावरांचे शेड कोरडे ठेवावे.<br>➢ जनावरांना स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी द्यावे<br>➢ जनावरांना कोवळा हिरवा चारा जास्त प्रमाणात खाऊ घालू नये.<br>➢ जनावरांच्या आहारामध्ये योग्य प्रमाणात वाळलेल्या चाऱ्याचा वापर करावा. |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर

दि. : १०.०७.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर